# मुंबई पोर्ट ट्रस्ट
# वैद्यकिय विभाग

## मुंबई पोर्ट ट्रस्टच्या कर्मचा-यांसाठी व अवलंबित कुटुंबिय,सेवानिवृत्त कर्मचारी त्याची पत्नी /किंवा तिचा पती यांना खालील नियम वैद्यकिय सुविधांसाठी लागू होतील.

१. वरील सुविधांचा लाभ घेण्यांसाठी रूग्णांनीा मुख्य चिकित्सा अधिकारी /सहाय्यक मुख्य चिकित्सा अधिकारी (डिस्पेन्सरी) यांच्या नावे इ-मेल तथा फॅक्स करावा. त्यामध्ये त्यानी पुढील तपशील देणे जरूरीचे आहे. रूग्णानी त्यांचे i).एम.ए.आर कार्ड नंबर(MAR No.) ii).संपुर्ण पत्ता iii).मोबाईल नंबर/घरचा फोन नंबर / कार्यालयाचा फोन नंबर. इत्यादी फॅक्स नंबर -२४१४५११५ किंवा इ-मेल वर -cmo@mbptmail.com पोच करावे.

२. सेवारत कर्मचा-यांसाठी ः सेवारत कर्मचा-यांनी आपतकालीन परिस्थितीत खासगी रूग्णालायातुन उपचार घेतला असले किंवा बाह्य रूग्ण उपचार पुर्ण झाल्यानतंर तसेच डिसर्चाज दिल्यानंतर सहा महिन्याच्या आत झालेल्या खर्चाच्या परताव्यासाठी अर्ज करावा.

सेवानिवृत्त कर्मचा-यांसाठी ः सेवानिवृत्त कर्मचा-यांनी आपत्कालीन परिस्थितीत खासगी रूग्णालायातुन उपचार घेतला असेल त्यांनी डिसर्चाज दिल्यानंतर दोन महिन्याच्या आत झालेल्या खर्चाच्या परताव्यासाठी अर्ज करावा बाह्य रूग्ण उपचार पुर्ण झाल्यानतंर सहा महिन्याच्या आत झालेल्या खर्चाच्या परताव्यासाठी अर्ज करावा.

३. सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सेवानिवृत्तीनंतर MAR Card व PPO Card असणे आवश्यक आहे.ज्या कर्मचा-यांनी MAR card किंवा PPO card चे पंजीकरण केले नसेल त्यांना आपत्कालीन परिस्थितीत खासगी रूग्णालायातुन उपचार घेतल्यास, झालेला खर्चाबावत ते या सुविधांचा लाभ घेण्यास पात्र नाही. सेवानिवृत्तीनंतर या परताव्याचा लाभ घेण्यासाठी त्यांनी एक महिन्याच्या आत पंजीकरणीच्या सर्व कार्यपद्धती पुर्ण करून घ्यावी.

४. फक्त आपत्कालीन परिस्थितीत कर्मचारी त्यांच्या घराजवळच्या खाजगी रूग्णालायातुन उपचार घेऊ शकतात. निकडीच्या प्रसंगी CMO/Sr.Dy.CMO (ACMOD) यांची स्वीकृती असावी.जर रूग्ण म्युनसिपल कॉर्पोरेशन न्यायधिकारक्षेत्राच्या बाहेर असेल (दहिसर/मुलुंड/मानखुर्द ) तरीही येथील रूग्णांनी मुंबई पोर्ट ट्रस्ट हॉस्पीटलमध्ये ओपीडी तसेच अंतगर्त उपचारांसाठी येणे आवश्यक आहे.

५. हिमो-डायलिससच्या उपचारासाठी झालेल्या खर्चाचा परतावा पोर्ट ट्रस्ट हॉस्पीटलच्या कार्यपद्धतीप्रमाणे मिळेल.

त्यासंबंधीत झालेला औषधांचा तसेच सुचर मटेरिअलसाठी झालेल्या खर्चाचा परतावा मिळू शकणार नाही.

वरील खर्चाचा परतावा घेण्यासाठी रूग्णाने पोर्ट ट्रस्ट हॉस्पीटलच्या चिकित्सा आधिका-यांकडुन औषधांचे व लागलेल्या इतर साहित्यांचे प्रिस्किप्शन घेणे गरजेचे आहे.हया संबंधीत सर्व नियन सेवारत कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचा-यांसाठी समान लागु आहेत.

६. बाहेरूना विकत घेतलेल्या औषधांच्या प्रिस्किप्शनवर आऊट ऑफ स्टॉकचा (OUT OF STOCK ) स्टॅम्प असणे जरूरीचे आहे तसेच N.R ( म्हणजे हया औषधांचा खर्च पोर्ट ट्रस्ट हॉस्पीटलकडुन मिळणार नाही चा स्टॅम्प डॉक्टरांच्या सुचने नुसार आहे का ते ओ.पी.डी बाहेर निघते वेळी तपासले पाहीजे).

७. अप्लायन्ससाठी (उपकरणे) अर्ज फक्त सेवारत कर्मचारी व त्यांचे कुटूंबिय व सेवानिवृत्त कर्मचा-याही करू शकतात. सेवानिवृत्त कर्मचा-याची पत्नी/पती या सुविधांसाठी अपात्र ठरतील .

८. ज्या उपचारासाठी रेफरन्स नोट दिली असेल त्या उपचाराव्यतिरिक्त केलेल्या उपचाराच्या खर्चाचा परतावा ग्राहय धरला जाणार नाही .तशी गरज भासल्यास., रेफरन्स नोटवर आधिक उपचाराची नोंद पोर्ट ट्रस्ट हॉस्पीटलच्या चिकित्सा आधिका-यांकडुन लिहून घेणे गरजेचे आहे.

९. खाजगी हॉस्पीटलमध्ये झालेल्या खर्चाची रक्कम जर दिलेल्या खर्चाच्या अंदाजे रकमेपेक्षा जास्त होत असेल तर पोर्ट ट्रस्ट हॉस्पीटलमध्ये आगाऊ कळविणे जरूरीचे आहे.सेवारत रूग्णाला दिलेल्या उपचाराचा खर्च क्रेडीट नोट व्यतिरिक्त आकारला जात असेल. तर रूग्णांने पोर्ट ट्रस्ट हॉस्पीटलमध्ये संबंधीत विभागामध्ये **(15- A)**आगाऊ कळविणे गरजेचे आहे.

१०. खाजगी हॉस्पीटलमध्ये झालेल्या खर्चाचा परतावा CISF कर्मचा-यांना त्यांच्या कुटुंबियांना व सेवानिवृत्त कर्मचा-यांना CGHS दराप्रमाणे मिळेल ( CGHS एप्रील २०१४ ).